अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई – ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०६.१०.२०२३

# –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | गुन्हा रजि.नं. ३२/२०२३ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीत लोकसेवकाचे नाव व कार्यालय | निरंजन जनार्दन गुंडूका, वय ५२ वर्षे, पद-वसाहत अधिकारी, वसाहत खाते, जी/साउथ विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, ना म जोशी मार्ग, प्रभादेवी, मुंबई |
| लाचेची मागणी | रूपये १,००,०००/- तडजोडी अंती रू. ८०,०००/- |
| स्विकारलेली लाच | रुपये ८०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी या वरळी मुंबई येथे झोपडीधारक आहेत. सन २०१२ मध्ये त्यांच्या एसआरए अंतर्गत झोपडया तोडण्यात आल्या होत्या. दि. ०७/०९/२०२२ रोजी महाय्यक आयुक्त तथा सक्षम अधिकारी, जी/साउथ, बृहन्मुंबई महानगरपालिका, ना म जोशी मार्ग, मुंबई यांनी एकूण २० झोपडीधारकांची पात्रता निश्चित केली असून त्यामध्ये फिर्यादी यांचा समावेश आहे. नमूद पात्रता आदेशाची प्रत फिर्यादी यांना नमूद कार्यालयाला वारंवारं भेट देवुनही प्राप्त न झाल्याने, सदर प्रकरणी फिर्यादी यांनी दि. २६/०८/२०२३ रोजी संबंधित लोकसेवक यांच्या कार्यालयात जावून लोकसेवकाची भेट घेतली असता लोकसवकाने प्रथम रू. १,५०,०००/- इतक्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती सदर रक्कम कमी करून रू. १,००,०००/- इतक्या लाचेची मागणी केली होती.<br>फिर्यादी यांना लोकसेवकांस लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. ११/०९/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहून तक्रार दिली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. ११/०९/२०२३ रोजी पडताळणी केली असता, पडताळणीदरम्यान लोकसेवक यांनी फिर्यादी यांच्याकडून प्रथम रू. १,००,०००/- व तडजोडी अंती रू.८०,०००/- इतक्या लाचेच्या रकमेची पंचासमक्ष मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानुसार आज दि. ०६/१०/२०२३ रोजी सापळा कारवाईदरम्यान लोकसेवक यांनी पंचासमक्ष फिर्यादी यांच्याकडून रू. ८०,०००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले म्हणून त्यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

मार्गदर्शन अधिकारी - श्री. विजय पाटील, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग.

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशासन
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०

संकेतस्थळ-acbmaharastra.gov.in
ईमेल- १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज-www.acbmaharastra.net. टोल फ्रि. क्र. १०६४
दुरध्वनी क्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००